Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

सप्टेंबर - २०२५ | पहिला अंक

## शिक्षक दिन विशेषांक



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary



## Guest Editor Rtn.Dr.Shrinivas Bhande



प्रिय रोटरी परिवार,

शिक्षक दिन हा केवळ एका व्यक्तीचा गौरव करण्याचा दिवस नाही, तर तो ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा उत्सव आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस आपण शिक्षक दिन म्हणून साजरा करतो, हे आपल्या शिक्षणपरंपरेचे वैशिष्ट्य आहे. गुरुंमुळेच समाजाला दिशा मिळते आणि प्रत्येक पिढीला जीवनमूल्यांचे भान येते.या आठवड्याच्या रोटरी दिशा शिक्षक दिन विशेषांकाचे अतिथी संपादक म्हणून मला अभिमान वाटतो की, आपण शिक्षण व शिक्षकांचे योगदान यांचे स्मरण करीत आहोत. रोटरी सेवेमध्येही शिक्षण हा महत्त्वाचा स्तंभ आहे. ज्ञानाचा प्रसार आणि तरुण पिढीला योग्य दिशा देणे, हीच खरी राष्ट्रसेवा आहे.शिक्षक हा फक्त वर्गात शिकवणारा नसतो, तर तो जीवन जगण्याची कला शिकवतो, चारित्र्य घडवतो आणि प्रत्येकामध्ये सुप्त असलेली क्षमता जागवतो. आज आपण सर्वांनी आपापल्या जीवनात आपल्याला दिशा देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करावी हीच खरी या दिवसाची सार्थकता.आपण 'ला अतिथी संपादक पदाचा सन'ान दिलात त्यामुळेमी माझा हा सन्मान समजतो.आपण सर्वांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद

रो.डॉ.श्रीनिवास भंडे
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- साप्ताहिक पत्रव्यवहार : डिस्ट्रीक्ट कडुन सायटेषन मिळण्यासाठी आरआय ज्युनियर व डिस्ट्रीक्ट ड्युज वेळेवर भरण्यासाठी पत्र आले. हे डयुज आपण पुर्वीच भरले आहेत.
- आयटी मिडीया डायरेक्टर प्रशांत भाटगावे यांनी २०२६ -२७ चे नवनियुक्त आरआय प्रेसीडेंट यांची सविस्तर माहिती सांगितली.
- रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या सर्व सदस्यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले
- माजी अध्यक्ष अनुप देवणीकर यांनी औसा व मुरुड या दोन गावी नविन रोटरी क्लब करत असल्याचे सांगितले मुरुड साठी डॉ. राजगोपाल तापडीया तर औसा साठी रविंद्र बनकर लिड घेणार आहेत असे सांगितले. नविन क्लब बनवण्यासाठी स्टेप सांगितल्या.
- डॉ. राजगोपाल तापडीया यांचे स्वागत वेदांत मंदाडे यांनी केले.
- चित्रकला स्पर्धा प्रोजेक्ट चेअरमन कपिल डुमने यांनी विषय निश्चित केले, स्पॉन्सरशिप मिळाली असे सांगितले. रोटरॅक्टर्सना मदतीचे आवाहन केले.
- नेशन बिल्डर अवार्ड गिरीष पैन्सलवार हे प्रोजेक्ट चेअरमन असतील असे सांगितले
- अन्नपूर्णा योजना फंड रेज साठी नाटक घेण्याची कल्पना सुचवली व या प्रोजेक्ट साठी प्रोजेक्ट चेअरमन रो. सचिन मालु यांची निवड करण्यात आली असे मा. अध्यक्ष रो. शशिकांत मोरलावार यांनी सांगितले
- रो. सचिन मालु यांनी सर्वांना प्रोजेक्ट यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन केले.
- मंथली बुलेटीन बुलेटिन चेअर अमोल बनाळे यांनी मंथली बुलेटिन ची माहिती दिला व रोटरॅक्ट प्रेसिडेंट वेदांत मंदाडे व डिजी सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले
- Lead२५ : चेन्नई येथे पार पडली रो. शशिकांत मोरलावार यांनी सविस्तर माहिती दिली. १३००० पेक्षा जास्त लोकांनी रजिस्ट्रेशन केले . आपल्या क्लबचे १३ लोकांनी अटेंड केला. तामिळनाडू चे उपमुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व आरआय प्रेसीडेंट उपस्थित होते. २५ मेम्बर्सना AKS केले. गौरगोपाल दासजी, कमल हसन, इस्रो चेअरमन असे वक्ते होते
- रो. श्रवण बियाणी यांनी गणपतीची कार्यशाळा प्रोजेक्टची प्रस्तावना केली. व प्रेझेन्टेशनसाठी प्रोजेक्ट चेअरमन शौनक दुरूगकर यांना पाचारण केले. शौनक यांनी प्रोजेक्टर सर्व कार्यक्रमाचे सादरीकरण केले. वयोगट ५-७० मध्ये ४१४ रजिस्ट्रेशन व ४५,००० फंड रेजिंग.
- गणपती कार्यशाळा प्रोजेक्ट चेअरमन शौनक दुरूगकर व भक्ती गोजमगुंडे यांचा क्लब तर्फे गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला
- रोटरॅक्ट क्लब प्रेसीडेंट क्लब मामेंटो देण्यात आला.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली.

**Guest of The Week**



Rtr.Vedant Mandade

**Man of The Meeting**



Rtn.Kalash Mundada

**1st Come in the Hall**



Rtn.Ajay Dudile

## राष्ट्र उभारणीत शिक्षकांचे योगदान

राष्ट्र उभारणीत शिक्षकांचे योगदानराष्ट्राच्या उभारणीत अनेक घटकांची आवश्यकता असते  विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, उद्योग, शेती, प्रशासन इत्यादी. मात्र, या सर्व घटकांचे यश हे त्या राष्ट्रातील सुशिक्षित, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिकांवर अवलंबून असते. आणि अशा नागरिकांचा पाया घालण्याचे कार्य शिक्षक करतात. म्हणूनच शिक्षकांना राष्ट्राचे खरे शिल्पकार व राष्ट्रीय उभारणीचे आधारस्तंभ म्हटले जाते.शिक्षकाचे कार्य केवळ पाठ्यपुस्तक शिकवण्यापुरते मर्यादित नसते. तो विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची तहान निर्माण करतो, विचारांना दिशा देतो, चांगल्या सवयी आणि नैतिक मूल्यांचे संस्कार घडवतो. एक चांगला शिक्षक विद्यार्थीला केवळ यशस्वी व्यावसायिकच बनवत नाही तर सजग, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून घडवतो. यामुळेच समाजात सामाजिक ऐक्य, प्रगतीची जाणीव आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ होते.इतिहास साक्षी आहे की जगातील अनेक महान नेते, वैज्ञानिक, समाजसुधारक आणि विचारवंत यांच्या घडणीत त्यांच्या शिक्षकांचा मोलाचा वाटा होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही शिक्षकांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीची प्रेरणा देऊन त्यांना बलिदानासाठी तयार केले. राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवन आणि विचार हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्याच जयंतीदिनी आपण ''शिक्षक दिन'' साजरा करतो, याचे कारण म्हणजे शिक्षकांचे महत्त्व मान्य करणे.आजच्या जागतिकीकरणाच्या युगात राष्ट्र अनेक आव्हानांना सामोरे जात आहे  बेरोजगारी, नैतिक अधःपतन, पर्यावरणीय समस्या, तांत्रिक स्पर्धा इत्यादी. अशा वेळी शिक्षकांची जबाबदारी अधिकच वाढली आहे. केवळ ज्ञानच नव्हे, तर कौशल्य, मूल्ये, सहनशीलता, सहकार्य भावना आणि राष्ट्रनिष्ठा या सर्व बाबी शिक्षक विद्यार्थ्यांत रुजवतात. त्यामुळे ते विद्यार्थ्यांना भविष्यातील सक्षम नेतृत्वासाठी तयार करतात.शिक्षक हे खरे शिल्पकार आहेत. जसे मूर्तिकार शिळेला आकार देऊन सुंदर मूर्ती घडवतो, तसाच शिक्षक विद्यार्थ्याच्या व्यक्ति'त्वाला आकार देतो आणि त्याला घडवून राष्ट्रासाठी योग्य बनवतो. यामुळे राष्ट्राची खरी उभारणी वर्गखोल्यांमध्ये घडते, असे म्हणणे योग्य ठरेल.म्हणूनच शिक्षकांचे योगदान हे राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत अमूल्य आहे. शिक्षकांमुळेच समाजात सुशिक्षित माणूस, माणसामुळे सुबक समाज आणि समाजामुळे मजबूत राष्ट्र उभे राहते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या शिक्षकांचा आदर ठेवून त्यांच्याबद्दल कृतज्ञता बाळगणे हे आपले कर्तव्य आहे

## Teachers in Rotary Club of Latur Mid-Town


Dr.Avinash Bhosale


Dr.Rajaram Davankar


Dr.Abhijeet Muglikar


Dr.Kiran Dande


Dr. Chandraprabhu Jangme


Dr.Dinesh Soni


Prof.Amar More


Prof. Vishal Ayachit


Prof. Sachin Malu


Prof.Omprakash Zurule


Prof. Rajesh Dayma


Prof. Manmath Panchakshari


Prof. Kiran Dhanashri


Prof. Pramod Kumbhar



## Rotary Mid Town this Week  Photo Gallery









## अभिनंदन

**रो.रविंद्र बनकर**
**फाउंडेशन Quiz**



CERTIFICATE
of Appreciation

Rotary
District 3132

Ravindra Bankar
Rotary Club of Latur Midtown

We are very pleased and deeply honored to present this certificate to you in recognition of your enthusiastic and active participation and successful completion of

Rotary Quiz 2.0.5 (The Rotary Foundation)

Your dedication to learning Rotary's principles, values, and rich legacy is truly appreciated. Thank you for embracing and promoting the Rotary spirit.

Rtn. Sudhir Lature

Rtn. Avinash Mathapati

| Achieved Percentage | Certificate Awarded On |
| --- | --- |
| 100% | 5-9-2025 |

Rotary QUIZ 2.0



**रो.मन्मथप्पा पंचाक्षरी**
**आजोबा झाल्याबद्दल**




Rudraksha Financial Services
LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
Mob. 8605596459

- LIC
- Banking
- NPS
- PMS
- Health Insurance
- General Insurance
- Mutual Fund
- Credit Card Cash
- Home Loan
- Education Loan
- Car Loan
- Gold Loan



Prashant S. Bhatgave
MDRT-USA - 2023 & 2024